महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर 413001

दूरध्वनी क्र. 0217-2324055 E-mail - jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. विससं/उशि/सोविसो/2024/ दि. 06/08/2024

प्रति,

1. कुलसचिव,
   पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ, सोलापूर
2. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित,विना अनुदानित व कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये, सोलापूर विभाग.

विषय : उच्च शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ :
1. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.शिष्यवृ-2024/प्र.क्र.105/तांशि-4, दि.8.7.2024
2. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा., पुणे यांचे परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/3852, दि.19 जुलै 2024
3. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा., पुणे यांचे परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/, दि.1 ऑगस्ट 2024

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भ क्र. 3 च्या परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे. सदर परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार कळविण्यात येते की, शासन व संचालनालयाने वेळोवेळी मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात स्पष्ट निर्देश दिलेले असताना काही संस्था / महाविदयालये पात्र लाभार्थी विदयार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क घेत असल्याबाबतच्या तक्रारी शासन व संचालनालयस्तरावर प्राप्त होत आहेत. सदरची बाब ही अत्यंत गंभीर असून शासन निर्देशाचे उल्लंघन करणार आहे. शासन निर्देशाचे अनुपालन न करणा-या संस्था / महाविदयालयाच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये, याबाबत सर्व संस्था / महाविदयालये यांनी दक्षता घ्यावी.

तरी, प्रस्तूत प्रकरणी संचालनालय / शासनाने दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत शासन निर्देशाचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

Signed by
Nalini Khemraj Tembhekar
Date: 07-08-2024 12:00:16

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

E-705297

सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग सोलापूर
आ.क्र.
प्र.अ. वि.स.सं.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९/२६१२६९४० Mail: prash.dhepune@gov.in

---

क्रमांक उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमोशि/ दि. १ ऑगस्ट, २०२४

**अत्यंत महत्वाचे**

**परिपत्रक**

**विषय :- उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणी बाबत**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र.शिष्यवृ.-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि- ४, दि.०८.०७.२०२४.
३. संचालनालयाचे परिपत्रक जा.क्र. ३८५२ व ३८५३, दि. १९ जूलै, २०२४
४. शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र. २०७/तांशि-४, दि. १९.०७.२०२४
५. संचालनालयाचे पत्र दि. २२.०७.२०२४
६. संचालनालयाचे परिपत्रक दि. २३.०७.२०२४

शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ व शासन निर्णय दि. ८.७.२०२४ अन्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक व व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेशीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येत आहे.

याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधिन दि. २९ जूलै, २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक आणि कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना सदरहू योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच शासन परिपत्रक दि. १९ जूलै, २०२४ अन्वये, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. प्रवेशावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यानुसार संचालनालयाच्या संदर्भाधिन दि. २२.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित महाविद्यालये व विद्यापीठे यांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

सदरहू योजनेचा सर्व पात्र विद्यार्थीनींना लाभ मिळणेकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी गुरुवार, दि. २५ जूलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. WEBINAR द्वारे ऑनलाईन पध्दतीने राज्यातील सर्व

विद्यार्थीनी, शिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच अकृषी विद्यापीठे यांच्यासमवेत ऑनलाईन पध्दतीने संवाद साधून सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजवणी व कार्यपध्दतीबाबत तपशीलवार विद्यार्थी, पालक, संस्थाचालक यांच्या प्रश्नांचे निराकरण केले आहे. या WEBINAR मध्ये देखील शासन निर्देशाप्रमाणे प्रवेश घेतेवेळी विद्यार्थीनींकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येऊ नये याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. तसेच या योजनासंबंधी विद्यार्थीनी, पालक, संस्था यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण होणेकरीता प्रश्नोत्तरे हे उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे शासन व संचालनालयाद्वारे वेळोवेळी मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात स्पष्ट निर्देश दिलेले असताना काही संस्था / महाविद्यालये पात्र लाभार्थी विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क घेत असल्याबाबतच्या तक्रारी शासन व संचालनालय स्तरावर प्राप्त होत आहेत. सदरची बाब ही अत्यंत गंभीर असून शासन निर्देशाचे उल्लंघन करणारी आहे. शासन निर्देशाचे अनुपालन न करणाऱ्या संस्था / महाविद्यालयाच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये, याबाबत सर्व संस्था / महाविद्यालये यांनी दक्षता घ्यावी.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील महाविद्यालय / संस्था यांना अचानक भेटी देऊन प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी शासन धोरण / निर्देशाप्रमाणे सुरु असल्याची तसेच संचालनालयाच्या निर्देशाप्रमाणे महाविद्यालयाच्या स्तरावर स्कॉलरशीप नोडल ऑफिसर नेमले असल्याची खात्री करण्यात यावी. याकरीता संबंधित विद्यापीठाशी योग्य समन्वय साधून योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही करावी.

प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करताना शासन निर्देशाचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज देण्यात यावी तसेच आवश्यकता वाटल्यास संबंधित सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 01-08-2024 19:58:17

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

प्रत : प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये (विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत)

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.